**लेखी चाचणी**

**प्र.१. खालील उतारा वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (६)

मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. ते आहे जनावरांचं इस्पितळ. ते आतून बघायचं असं माझ्या मनात खूप दिवसांपासून होतं. एकदा तो योग आला. कमानीच्या आत तर सहज प्रवेश मिळाला. उजवीकडं एक छोटीशी इमारत दिसते. हे बहुधा कार्यालय असावं. कार्यालयाच्या दाराशीच भिंतीवर एक मोठी तसबीर आहे. त्या तसबिरीत बैल, घोडा, कुत्रा, मांजर, शेळी अशी वेगवेगळ्या जनावरांची चित्रं आहेत. खाली एक छोटंसं पण मनाला भिडणारं वाक्य आहे, 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का ?'


माणसाच्या दयाबुद्धीला, करुणेला मुक्या प्राण्यांनी केलेलं ते आवाहन होतं. मला आत कुठंतरी हालवून सोडतं. आता मी कार्यालयात पाऊल टाकते. समोरच्या कपाटावर उदी रंगाचा एक गलेलठ्ठ बोका मजेत आपल्या मिशा साफ करत बसला आहे. मला बघताच तो कपाटावरून उडी मारतो आणि साहेबांच्या टेबलावर येऊन बसतो.

**अ. कोण ते लिहा.** (२)


i. इस्पितळात जाणारी - ii. उदी रंगाचा -

**आ. आकृती पूर्ण करा .** (२)

i.



ii.




इ. 'सर्वच प्राणी माणसाच्या प्रेमासाठी भुकेलेले असतात' तुमच्या मते हे विधान बरोबर आहे का ते स्पष्ट करुन लिहा.

(२)

**प्र.२. खालील संवाद वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (६)

(शाळेच्या मधल्या सुट्टीमध्ये नेहा व सायली या दोन मैत्रिणींमधील हा संवाद )

नेहा : सायली, स्वातंत्र्यदिन - प्रजासत्ताक दिन या शब्दांमधील 'दिन' शब्दाचा अर्थ 'दिवस' असा आहे, हो ना ग ?

सायली: हो.... असाच आहे. का ग ?

नेहा: अगं, मा॰च्या धड्यात हा शब्द आला होता, तेव्हा बाईंनी या शब्दाचा अर्थ सांगितला होता 'गरीब' !

सायली: दोन्ही शब्द नीट बघितलेस का तू? कसे लिहिले आहेत ते ?

नेहा : आपण आता पुस्तकातच बघूया. शब्द कसा लिहिलाय ते.....

सायली: हं. हा बघ मागचा धडा.... आणि हा शब्द 'दीन'!

नेहा : अरे हो, शब्द एकच असला, तरी दोन्ही शब्द लिहिण्यात फरक आहे.

सायली : बरोबर! 'दीन' शब्दात 'दी' दीर्घ आहे. 'दीन' म्हणजे गरीब.
'दिन' शब्दात 'दि' ऱ्हस्व आहे. 'दिन' म्हणजे दिवस.

नेहा : शब्दांची किती गंमत आहे ना ! अक्षरांत वरवर साम्य आहे; पण लेखनातल्या फरकामुळे अर्थात केवढा फरक !

सायली : आपण दोघीजणी असे नवीन शब्द आणि त्याचे विविध अर्थ रोज 'समजून घेऊया.

नेहा : अगं पण कसे ? आपल्याला सारखे आपल्या बाईंकडे जावे लागेल अर्थ विचारायला!

सायली: अगं नाही. मला माहीत आहे त्याची गंमत. शब्दांचे अर्थ आपले आपण कसे शोधायचे ते मी तुला दाखवते.

अ. वरील संवादात प्रत्यक्ष किती व्यक्ती सहभागी आहेत ? (१)

आ. खाली दिलेला शब्द वापरून दोन वेगवेगळे अर्थाची स्वतंत्र वाक्यं लिहा. (२)

i. दिन-                ii. दीन -

इ. नवीन शब्द व त्याचे विविध अर्थ समजून घेण्यासाठी तुम्ही कशा कशाची मदत घ्याल ते लिहा. (3)

प्र. २. अ. **खालील कविता वाचा व त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (६)

या सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले,
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले!

भरकटलेल्या जगात नाही
संस्कारांची जाण कुणाला,
तुळशीवरल्या त्या पणतीचे
जळणे मजला शिकवून गेले !

प्रेम काय ते कुणा न ठावे
नदी सागरा जीव का लावे ?
स्वैर होऊनी नदीचे पळणे
जगणे मजला शिकवून गेले !

बुलंद तरीही असे हौसले
पिल्लासाठी किती सोसले,
चिवचिवणाऱ्या चोचीमधले
दाणे मजला शिकवून गेले !
सागराची अथांगता अन्
ही वृक्षाची स्थितप्रज्ञता,
दुसऱ्यासाठी घाव सोसणे
जगणे मजला शिकवून गेले !

अ . कवितेच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा. (२)

| क्रमांक | कवीला जगविने शिकवणारे घटक | या घटकापासून कवी काय शिकले |
|---|---|---|
| अ | चंद्र , चांदणे | |
| आ | पणती | |
| इ | नदी | |
| ई | सागर | |

आ . 'दुसऱ्यासाठी घाव सोसणे' या ओळीतील तुम्हांला कळलेला अर्थ लिहा . (२)

इ. 'जीवन गाणे' या कवितेचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. (२)

**प्र.३. आ. पत्रलेखन -** (५)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मा. विभागीय अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,<br>ठाणे विभाग | ← | रहिवाशी या नात्याने पत्र | → | अनियमित व वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्याबाबत तक्रार पत्र |

प्र. ४. **'तुमच्या परीसरात संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु होणार आहे.' या विषयावर जाहिरात तयार करा.** (५)

प्र.५. **सूचनेनुसार कृती करा.** (४)

अ. 'बे' हा उपसर्ग लावून दोन शब्द तयार करा व लिहा. (२)

आ. खालील म्हण पूर्ण करा. व लिहा. (१)

मूर्ती लहान पण ..............................

इ. खालील वाक्यातील काळ ओळखा. (१)

i आमची बैलगाडी जात आहे

**प्र. ६. खालील बातमीचे वाचन करुन त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** (५)

**आमिर खानचा होणार पालिकेकडून सन्मान**

सोलापूर : लोक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी अभिनेता आमिर खान यांनी पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू केलेल्या पाणी बचतीच्या उपक्रमाची दखल घेत महापालिकेतर्फे मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्याचा प्रस्ताव २५ मे रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सभेत देण्यात आला आहे. अभिनेता अमीर खानने पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून राज्यातील शेकडो गावांसाठी जलमित्र म्हणून नोंदणी सुरू केले आहे. या माध्यमातून सुरू केलेल्या वॉटरकप उपक्रमास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातही गेली दोन वर्षे ही चळवळ वेगाने वाढत आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी आमिर खान यांनी पत्नीसह श्रमदानात सहभाग नोंदविला.

अ .कोण ते लिहा .

(२)

i. सन्मान करणारी संस्था

ii. चळवळ वेगाने वाढणारे स्थान

आ . उत्तर लिहा.

(३)

i. आमिर खानने सुरू केलेला उपक्रम -

ii. पाणी फाउंडेशन ने सुरु केलेल्या नाव नोंदणीचा विषय-

iii. पाणी फाऊंडेशनच्या कार्याचे उद्दिष्ट कोणते आहे ?

**प्र .७. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'माझा आवडता खेळ' या विषयावर दहा ते बारा ओळी निबंध लिहा .**

(५)

मुद्दे - तो कसा खेळतात - खेळात मिळणारा आनंद - तो खेळ का आवडतो ? - तुमचे प्रेरणास्थान - कौशल्य कसे वाढवणार ?

**प्र. ८. सूचनेवर आधारित कृती करा .**

(८)

अ . खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.

(२)

i .आपण गिर्यारोहणाला का निघालो आहोत ?

ii . वाहवा, काय सुंदर देखावा आहे हा !

आ . खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून ती वाक्ये पुन्हा लिहा .

(२)

i . अरे गरम गरम वडे खाऊ नयेत

ii . प्रिय उद्धव मेघा राधा व जानवी अनेक आशीर्वाद

इ . खालील वाक्य शुद्ध स्वरूपात लिहा .

(२)

i .संतत परिश्रम करूनच मि विजेता खेळाडु होऊ शकलो .

ii .ज्येष्ट महिना सुरू झाला कि पावसाचे वेध लागतात .

इ . खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा .

(२)

i .हैराण होणे -        ii . काळजाला घरे पडणे -